Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

Gunamalika
Sanskrit
Lipi – Devnagari
Folio – Various (107)
Printed
Very old
Size: 8.4" x 5.5"

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

श्री॰ दानराजतापसी

॥अथश्रीस्व.गुणमालिकाम॰ १ प्रा.॥

वेण

JNANA SIMHASANA VIDYA MANDIR
LIBRARY.
Jangamwadi Math, VARANASI.
Acc. No. 3858

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥ श्रीमातापितृभ्योनमः ॥ श्रीकुलदेवताभ्योनमः ॥ श्रीज्ञानेश्वरनामदेवाद्यनमोनमः ॥

श्लोक—ॐपार्थायप्रतिबोधितांभगवतानारायणेनस्वयं ॥ व्यासेनग्रथितांपुराणमुनिनामध्येमहाभारते ॥ अद्वैतामृतवर्षणींभगवतीमष्टादशाध्यायिनी ॥ भवत्वामनुसंदधामिभगवद्गीतेभवद्वेषिणीं॥१॥ वसुदेवसुतंदेवंकंसचाणूरमर्दनं॥देवकीपरमानंदंकृष्णंवंदेजगद्गुरुं॥२ मूकंकरोतिवाचालंपंगुंलंघयतेगिरिम्॥यत्कृपातमहंवंदेपरमानंदमाधवं ॥ ३ ॥

ॐनमोजीमंगळमूर्ती ॥ वक्रतुंडाश्रीगणपती ॥ मूळारंभाज्ञानज्योती ॥ श्रुतिध्यातीतुजनमो ॥ १ ॥ जयजयाजीअखंडधामा ॥ निग

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

मातीततूंविश्रामा ॥ मंगलनिधीसगुणगुणधामा ॥ सज्जनजीवना-
आत्मरूपा ॥ २ ॥ पद्मासनींअखंडस्थीर ॥ सिध्धसाधकींपरमउ-
दार ॥ गुणवर्णनींथकलेथोर ॥ अपरंपारलीलातुझी ॥ ३ ॥ लंबोद
राविघ्नहरणा ॥ चतुर्भुजासूक्ष्मनयना ॥ सुबोधअवतारगुणभूषणा॥
मुनिजनध्यानानमोनमो ॥ ४ ॥ आतांकृपालुवाकृपाकरीं ॥ रंगवींगु
णाचीगुणलहरी ॥ बुद्धिदातासकळांतरीं ॥ प्रेरणाकरींग्रंथारंभा॥५॥
तुमचेकृपेचेंशुद्धअक्षर ॥ स्फटिकजैसेंमुक्ताफळ ॥ तेथेंपामराचीवा-
चाबरळ ॥ कृपासबळतूमची ॥ ६ ॥ तुह्मीसकळब्रह्मांडआधार ॥
आदिअंतींसर्वांगोचर ॥ मूळरूपनामेंप्रचार ॥ हापूर्णविचारअ
नादी ॥ ७ ॥ नमनमाझेंपुढतपुढती ॥ गुणग्रंथाद्यावीमिती ॥ उणें
पुरविणेंतुह्मांहातीं ॥ हेंचिमागणेंदातारा ॥ ८ ॥ तुमचेअभयवच

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

नाचाआधार ॥ म्हणोनिकरितोंनमस्कार ॥ निजरूपसत्तामायाप्र
ार ॥ तयानमस्कारसाष्टांग ॥९ ॥ धन्यधन्यमायवागेश्वरी ॥ स
कळविद्येचीमूळाक्षरी ॥ विणाशोभेदक्षिणकरीं ॥ विजयमूर्तीसर्वदां
॥ १० ॥ तूंआदिरूपाचोचित्कळी ॥ त्रिगुणरूपीमायाजाळी ॥ स
कलसत्तात्रिभुवनांतरीं ॥ ऐसेंगर्जतीवेदशास्त्रें ॥ ११ ॥ अनंतरूपा-
चीरूपिणी ॥ सकलजीवसूत्रांचीस्वामिणी ॥ त्राहेत्राहेजगज्जननी॥
करींप्रेरणामनींगुणग्रंथा ॥ १२ ॥ तुझेकृपामृततुषारें ॥ पंगूलांघि
तीगिरीशिखरें ॥ मुकेगर्जतीमहामंत्रें ॥ तरीह्याग्रंथींरसभरीं ॥१३॥
विशाळभाळचिन्मयनयनी ॥ कांतीजैशीसूर्यतरणी ॥ यालागींदो-
न्हीकरजोडोनी ॥ अनन्यपणेंशरणतुज ॥ १४ ॥ अंबेजगदंबेमाय-
राणी ॥ प्रसंगींधीरदेमायबहिणी ॥ शरणतुजमीअनन्यचरणीं॥क-

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

दपद्मस्थानींगौरवतुझा ॥ १५ ॥ आतांनमूंश्रीगुरुनाथ ॥ तोपुरवि
तासकळअर्थ ॥ भोळ्याभाविकांसनाथ ॥ तारीअनाथदीनबंधू॥१६
जयजयाजीश्रीगुरूमूर्ति ॥ सगुणव्यापकाश्रीपती ॥ तववर्णनींवेद
श्रुति ॥ मौन्यनिश्चींतराहिल्या ॥ १७ ॥ जयजयाजीअव्यक्ता ॥
पूर्णबोधासदोदिता ॥ तुझेगुणानुवादवर्णितां ॥ शेषहीकदांनातुडे
॥ १८ ॥ ब्रह्मादिकपुरंदर ॥ निर्जरनेणतीतवपार ॥ दुर्बळदास
जोडोनिकर ॥ भावेंनमस्कारकरीचरणीं ॥ १९ ॥ ऐशियांचीमती-
ठेंगणी ॥ जाहलेश्रीगुरूचूडामणी ॥ तेथेंमीप्राकृतदीनवाणी ॥ का
यबोलबोलूंआतां ॥ २० ॥ आतांबहूस्तवनकरणें ॥ मनावाटेला-
जिरवाणें ॥ सूर्याचियाअंगाउटणें ॥ कायलावणेंघडेल ॥ २१ ॥
नातरींतोसुवर्णगिरिवर ॥ रत्नयुक्तदिसेसुंदर ॥ त्यासींगुंजांचाशृं-

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

।स्व,गु

गार ॥ हाविचारकेवींघडे ॥ २२ ॥ अथवातोक्षरासिंधू ॥ अमृतें-
भरलाअगाधू ॥ त्यासींशर्करानैवेद्यू ॥ हेंविषदूकेवींघडे ॥ २३ ॥ ना
तरींतेंजान्हवीवारी ॥ त्रैलोक्यपातकेंनिवारी ॥ तियेसींन्हाणावेंथि
छरीं ॥ ऐसाविचारकेवींघडे ॥ २४ ॥ खद्योतआपुलेंतेजमिरवी ॥
विरोळाशेषातेंशिकवी ॥ उपजतबाळातेंरांगवी ॥ ऐशियाठेवठेवीके
वींघडती ॥ २५ ॥ अहोयागगनासीगवसणी ॥ वायूचीमोटबांधेल
कवणीं॥डोळ्यांतसामावेधरणी॥ ॥ ऐशीकरणीकेवींघडे॥२६॥मश्यक
मेरूतेंकंवटाळी ॥ टिटवीसागरातेंगिळी ॥ मुंगीपृथ्वीपायांतळीं॥हें
भूमंडळींकेवींघडे॥२७॥पांगूळधांवेपवनापाठी॥आंधळाओंवीनक्षत्र
गांठी ॥ नातरींबधिराचेश्रवणपुटीं ॥ शास्त्रगोष्टीऐकणें ॥ २८॥ हें
हीघडोंशकेएकेरीती ॥ परीकरितांनयेतवस्तुती ॥ यालागींमौन्येंच-

अ ०१

॥ ३

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

चरणींमिठी ॥ नमननिश्चितीपायांसी ॥ २९ ॥ परीस्तवकरावया एककारण ॥ पुरविशीवाचारसींरसभरण ॥ तूंदातामहादीनालागून ॥ चरित्रगुणनेईकळसा ॥३० ॥यालागींजोडोनिदोन्हीकर ॥ करितोंसाष्टांगनमस्कार ॥ मगश्रीगुरूअभयदानीउत्तर ॥ ठेविलाकरमस्तकीं ॥ ३१ ॥ ऐसाश्रीगुरूवरलाधला ॥ मगआनंदेंग्रंथारंभकेला ॥ आतांनमूंमातापितयांला ॥ ज्यानींदेहपाळिलाजीवेंभावें॥३२ याकारणेंमातापिता ॥ आधींवंदावींसांडोनिदुरिता ॥ आतांवंदूंकुळदेवता ॥ जेअंगभूतईश्वराचे ॥ ३३ ॥ तेसकलांचेशरीरीं ॥ राहटीकरितीआंतवाहेरी ॥ कुळाचारकुळबोहरी ॥ तोचिहरीदाविता ॥ ३४ ॥ तेसकलार्थकामना ॥ करितोंपूर्णसद्गुरूवचना ॥ कुलदेवतातूंचिनारायणा ॥ साष्टांगप्रणिपातेंनमनकरितों ॥ ३५ ॥ आ

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

तांनमूंव्यासादिमहाज्ञाते ॥ सकलशास्त्रांचेअधिष्ठाते ॥ भूतभवि
ष्यजाणते ॥ मुनिजनसंतांनमोनमो ॥ ३६ ॥ आतांनमूंश्री-
ज्ञानराजमाउली ॥ सकलसंतमहंतांचीसाउली ॥ अमृतसंजीवनी-
ज्ञानेश्वरी ॥ प्रगटबोलीमराठी ॥ ३७॥ नमोनमोजीराजयोगीदेवा
॥ जोनिजभक्तांचाज्ञानदिवा ॥ अज्ञानभोळ्याभाविकांजीवां ॥ सु
बोधसुखठेवाउघडकेला ॥ ३८ ॥ जोसकळभक्तशिरोमणी ॥ शुद्ध-
बोधज्ञानांजनी ॥ तोआळिंकापूरस्थानीं ॥ ईंद्रायणीतटींस्थीर॥३९
त्राहेत्राहेजीदातारा ॥ कठीणत्रिविधतापाचीज्वाळा ॥ सोडवींया-
पासोनिकृपाळा ॥ लागूंदेचाळाभक्तीचा ॥ ४० ॥ जरीहोशीकृपेनें-
सरळ ॥ तरीचउमटतीबोलरसाळ ॥ स्वात्मबुद्धिप्रेमसरळ ॥ बुद्धि
बरळजाऊंनेदी ॥ ४१ ॥ आतांकृपाळुवाकृपाकरीं ॥ सोंडवींकुबुद्धि

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

पासोनिसत्वरी ॥ लागावासंतसंगअंतरीं ॥ ऐसेंकरींदातारा॥४२॥
आतांनमूकळगळूनामदेवा ॥ तुमचेनामाचानिजात्मठेवा ॥ उ
घडकरणपराभाग्यसदैवा ॥ कैसेनिजीवांघडेलकीं ॥ ४३ ॥ आह्मा
नमातिमंदज्ञानहीन ॥ नाहींसंतसेवादेहपराधीन ॥ यात्रानेम-
नामस्मरण ॥ सदांआचरणतेंहीनाहीं ॥ ४४ ॥ तरीतूंस्वामीदाता
रा ॥ सांभाळींआपुलीनिदमाळा ॥ आह्मांगामरांह्मातीकृपाळा ॥
कायकळावाढविशी ॥ ४५ ॥ स्वबोधगुणमालिकापाठ ॥ ह्मासंतां-
घरींचाप्राचीनहाट ॥ आह्मानिमित्यबोभाट ॥ तुमचेकृपेंलाधलों
॥ ४६ ॥ जैसेंमुगानेंघरिलेंमनां ॥ समुद्रओलांडीनअर्धक्षणीं ॥ प-
रीहनव्हेतिचीकरणी ॥ आंधकारसंपूर्णआपुला ॥ ४७ ॥ आतांन
तूंसंतमहंतां ॥ सिद्धीसन्यावोहीगुणवार्ता ॥ जोआवडपंढरीनाथा ॥

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

तीरसाळकथाहृदयींवसो ॥ ४८ ॥ संतवचनींठेवोनिध्यान ॥ नाहीं
केलेंवाचाळपण ॥ गुणीगुणाचेंसगुणकीर्तन ॥ प्राकृतपणेंमनबोधा
॥ ४९ ॥ मूळसांडोनिसर्वथा ॥ नाहींवाढविलेंअर्था ॥ चतुरींशोधो
निपहावेंग्रंथा ॥ दोषसर्वयाठेवूंनये ॥ ५० ॥ याहीवरीअविकउणें॥
घडलेंअसेलअज्ञानपणें ॥ तरीसर्वस्वक्षमाकरणें ॥ घेतलेंधरणेंदा-
तारा॥५१॥बाळकनकळोनिअपराधीझाला॥तरीक्षमाकरणेंआहेमाते
ला ॥ तैसेतुम्हीसंतमाउलीदयाळा ॥ पुरवालळादासाचा ॥ ५२ ॥
शेषादिशिणलेवर्णितां ॥ तेथेंपामराचीकायकथा ॥ म्हणोनिचरणीं-
ठेविलामाथा ॥ सकळसंतांनमोनमो ॥ ५३ ॥ आतांकरूंग्रंथारंभू॥
जोमनबुद्धीचासंवादू ॥ आधारश्रीगीतापरमार्थबोधू ॥ हास्वबोधी
छंदूगुणमालिका ॥ ५४ ॥ आदिमाताश्रीज्ञानदेवीटीका ॥ त्यांती

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

लगुणाचीगुणघुटिका ॥ जोश्रीकृष्णाचापार्थसखा ॥ उपदेशानिक-
तयाकेला ॥ ५५ ॥ ज्ञानदेवीशब्दअर्थसखोल ॥ आह्मांमूढांनकळे-
त्यांतीलबोल ॥ म्हणोनिश्रीगुरूदीनदयाळ ॥ उपदेशीप्रेमळसुबु-
द्धि ॥ ५६ ॥ पुढीलअध्यायींनिरूपण ॥ मायागुणत्रयीनिर्माण॥ज्ञा-
नेंअज्ञानखंडण ॥ रसाळपणेंबहूगोड ॥ ५७ ॥ गोडजैशीमधूरसा-
खर ॥ सत्वगुणीगुणप्रकार ॥ श्रोतेअवधानयापरिकर ॥ करास्थी
रअंतर पांडुरंगीं ॥ ५८ ॥ वेदरूपीभगवद्गीता ॥ ज्ञानदेवीज्ञान-
सरिता ॥ त्यांतीलबिंदुमात्रभावार्था ॥ गुणअर्थाअभ्यासीं ॥ ५९ ॥
तुह्मीसंतश्रोतेमायबाप ॥ श्रवणार्थींघालक्षचित ॥ अद्वैतभावाची
मालिकानित ॥ हापुरवाअर्थमनींचा ॥ ६० ॥ ऐसेंहेंसौभाग्यपण ॥
कैंहातींलागनिधान ॥ जरींघालएवढेंदान ॥ तरींचरणनसोडींमी

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

॥ ६१ ॥श्रीनामयावरदाकेशवस्वामी ॥ श्रीरंगींप्रेमजडोविठ्ठलनामीं ॥ पुंडलीकवरदाजपअंतर्यामीं ॥ श्रीकांतीनिजधामींहीआवडतुम्हां ॥ ६२ ॥ इतीश्रीस्वबोधगुणमालिका॥ संमतश्रीज्ञानदेवीटीका ॥वंदूंसंतचरणपादुका ॥ प्रथमोध्यायरसाळहा ॥ ६३ ॥ पुंडलीकवरदाहरिविठ्ठल ॥

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

श्री० ज्ञानराजमाउलां.

॥अथश्रीस्व.गुणमालिकाअ० २ प्रा.॥

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥ जयज
यज्ञानमकरंदशुद्धे ॥ उदारवाणीपरिमळाविदगदे ॥ आनंदभयनाश-
मशुद्धबुद्धे ॥ प्रणवस्थाननिधेआदिमाये ॥ १ ॥ जयजयाजीआदि
नाथा ॥ मुळारंभातूंकर्ता ॥ ओतप्रोतपूर्णसरिता ॥ सूक्ष्मस्थूलता
सर्वदेहीं ॥ २ ॥ ऐसातूंब्रम्हांडचालक ॥ सर्वजगाचातूंजनक ॥
चराचरब्रम्हांडव्यापक ॥ सुखदायकजडजीवां ॥ ३ ॥ धन्यधन्य
तुमचामहिमा ॥ वेदशास्त्रांझालीसीमा ॥ पूर्णानंदपूर्णधामा ॥ पू
र्णकामापरेशा ॥ ४ ॥ भवभयनाशकजगभूषणा ॥ जगतारकावि
श्वजीवना ॥ विश्वकल्याणाजनार्दना ॥ नारायणाविश्वरूपा ॥ ५ ॥
नानापरीचेविषयजाळ ॥ तुझियानामेंपळतीसकळ ॥ ऐसातूंदीन-
दयाळ ॥ बहूकृपाळश्रीरंगा ॥ ६ ॥ रंगायावेंआतांरंगणीं ॥ त्रिगु

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

णभक्तिरूपाआणीं ॥ जेणेंअज्ञानीजीवहोयसज्ञानी॥ लागतीलच्या
नींस्वकर्मी ॥ ७ ॥ अहोसनकसनंदनमंगळधामा ॥ गुणातीतगुण
विश्रामा ॥ परमपवित्रतुझामहिमा ॥ नामअनामातीततूं ॥ ८ ॥
तोचितूंसद्गुरूज्ञानदाता ॥ नमनकरितोंचालवींग्रंथा ॥ अज्ञानजाळू
नज्ञानपंथा ॥ लावींअनंतायेदेहीं ॥ ९ ॥ कामीअथवानिष्कामी ॥
हेंजाणतांसकळस्वामी ॥ आमुच्याअपराधाच्याउर्मी ॥ लिहितांध
रणीपुरेना ॥ १० ॥ हेंखरेंअपराधपण ॥ परीतूंपतीतपावननाराय
ण ॥ आतांआम्हीजाऊंकवणाशरण ॥ म्हणोनिचरणधरियेले ॥
॥ ११ ॥ आतांयाग्रंथाहेंचिकारण ॥ मनेंबुद्धीसकेलाप्रश्न ॥ कां-
नआवडेतुजहरिकीर्तन ॥ बुद्धिमलीनदुर्व्यसनी ॥ १२ ॥ बुद्धि
म्हणेतूंमाझाआप्तबंधू ॥ महाचंचलविषयांधू ॥ कर्मयोगेंघडला

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

संबंधू ॥ आतांफुकटविरोधूकासया ॥ १३ ॥ तुम्हींज्याचाकराल-
आठव ॥ तीकडेतसरआम्हींइंद्रियेंसर्व ॥ तुमचेसत्तेचाआम्हागौ-
रव ॥ कांतुम्हीरावआम्हीप्रजा ॥ १४ ॥ एसेंएकोनिमनजाहलें-
खिन्न ॥ चलाउभयताजाऊंश्रीगुरूसींशरण॥तोचिसंशयकरींलनि-
वारण ॥ हेंचिस्वबोधपणआलेंअंगीं ॥ १५ ॥ सर्वांगथरथरोनी ॥
देहरोमांचितअश्रुनयनीं ॥ साष्टांगप्रणिपातेंजोडोनिपाणी ॥ अन-
न्यचरणींविनवीतसे ॥ १६ ॥ श्रीगुरूविश्वनाथदातारा ॥ कैसेनी-
दुबीचाचुकेलफेरा ॥ सुबुद्धिज्ञानकीर्तनपसारा ॥ ऐशाविचाराका
यतप ॥ १७ ॥ ऐकोनिश्रीगुरूबोलतीवचन ॥ वत्सातुजनाहींआ
त्मज्ञान ॥ ह्मणोनिनघडेहरिकीर्तन ॥ भजनपूजनपरमार्थी॥१८॥
येविषयींतुजसांगेनकथा ॥ जेणेंसंतोषहोयतुझियाचित्ता ॥ तेंउघ

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

डतुजसांगूआतां ॥ जेंपरमार्थसाध्यकरी ॥ १९ ॥ हेंकुबुद्धिलक्षणकै-
सेनीआलें ॥ हेंतूंपुत्रसीतरीतुजसांगूंभलें ॥ जेप्रवृत्तिनेंगुंडाळिले ॥
तेगुंतलेकर्मगूणीं ॥ २० ॥ आतांप्रवृत्तिचेंआणिनिवृत्तिचेंरूप ॥
तुजसांगूंउघडस्वरूप ॥ आदिमायेचाअंशदोन्हीरूप ॥ नटलीस्व-
रूपजगींराया ॥२१॥ याउभयरूपांचागुणविस्तार ॥ तुजसांगतों-
सविस्तर ॥ निवृत्तिप्रवृत्तिनामेंसुंदर ॥ हाअवतारभूमंडळीं ॥ २२
निवृत्तीचापिताज्ञानसागर ॥ महाचतुरधीरउदार ॥ सुबुद्धिदाता-
जैसासागर ॥ मातासहोदरसत्वशांती ॥ २३ ॥ बंधूपरमार्थसत्व-
धीर ॥ एकांतस्थानीदोघांविचार ॥ एकमेकांतनपडेअंतर ॥ ऐशा-
विचारेंनांदती ॥ २४ ॥ आतांप्रवृत्तीचापिताअज्ञान ॥ माताचिंते
चाअंशपूर्ण ॥ बंधुभ्रमधरीकवटाळून ॥ ह्मणेनजावेंटाकूनमजदीना

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

॥ २५ ॥ ऐशायादोघीस्त्रियांचाएकवर ॥ तोमनराजामहाचतूर ॥
तयाचेदोघेप्रधाननामेंसुंदर ॥ संकल्पविकल्पसन्निधी ॥ २६ ॥ म-
नाचीआवडतीबहिणबुद्धी ॥ उभयतांरमवीनानाछंदीं ॥ गर्भिणी
स्त्रियाजाहल्याआनंदी ॥ परीमनलागलेंछंदींप्रवृत्तीच्या ॥ २७ ॥
प्रवृत्तीनेंमोहिलेंमनासी ॥ ह्मणेबाहेरदवडावेंनिवृत्तीसी ॥ मत्सरद्वे-
षजाणोनिमानसीं ॥ निरंजनवनासीधाडिलें ॥ २८ ॥ पुढेंतीनिवृत्ति
बाळेंसुंदर ॥ निरंजनींप्रसवलीप्रियकर ॥ त्यांचींनामेंअतिसुंदर ॥
श्रोतेचतूरपरिसावें ॥ २९ ॥ प्रथमपुत्रशुद्धभाव ॥ दुस्तराज्ञानसा-
गरविवेकराव ॥ वैराग्यआणिविचारसद्गुणस्वभाव ॥ बोधकनिष्टपां
चवा ॥३०॥ भक्तिक्षमादयाशांती ॥ ह्याचारकन्यारत्नज्योती ॥
ऐशासहकुटुंबदिनराती ॥ झालीकरमितीनिवृत्ति ॥ ३१ ॥ इकडेप्र

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

वृत्तिझालीप्रसूत ॥ बाळेंरजतमगुणेंमंडित ॥ नामेंऐकास्तावचित्त॥
जींविख्यातसकळजगीं ॥ ३२ ॥ मोहकामक्रोधदंभ ॥ मदमत्सर
सातवालोभ ॥ आतांकन्येचासांगूंमूळारंभ ॥ जेंस्वयंभअनादिचें
॥ ३३ ॥ आशातृष्णाकल्पना ॥ भ्रांतीइच्छावासना ॥ याषड्क-
न्याआवडतीमना ॥ आणिप्रवृत्तिगुणाबहुतप्रीती ॥ ३४॥ यास-
र्वांचेंदास्यत्वकोणकरी ॥ दुर्बुद्धिबाळकाकंठींधरी ॥ न्हाणीधुणीपा-
यावरी ॥ पाळणकरीआदरानें ॥ ३५ ॥ ऐसाप्रवृत्तिचास्वेळपसारा॥
दुर्बुद्धीनेंफसविलेंमनराजवीरा ॥ नसुचेकांहींअज्ञाननरा ॥ हाकर्मफे
रामायेचा ॥ ३६ ॥ यालागींस्वकर्मआचरणींराहेंस्थिर ॥ तरींचला
गेसुबुद्धीचापदर ॥ उपासनेचाधरींविचार ॥ तेणेंअंतरशुद्धहोय॥३७
येचविषयींश्रीगीताज्ञानेश्वरी ॥ प्रगटसुबोधपार्थासीकरी ॥ श्री-

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

कृष्णजगद्गुरूउपदेशचतूरी ॥ श्रवणकरींमनानंदा ॥ ३८ ॥ परीहें-
गुरूरायेंनवलकेलें ॥ एरंडदंडींरसभरिले ॥ हेंभाग्यबळेंलाधलें ॥
पवित्रकेलेंगुरुरायें ॥ ३९ ॥ श्रीगुरुरायेंजीवदविलीवाणी ॥ तीच-
श्रीकृष्णउपदेशगीतारत्नीं ॥ जेंगुजकथिलेंअर्जुनालागोनी ॥ तेंचि-
ध्यानीधनंजया ॥ ४० ॥ तोंविजयीह्मणेदेवाधिदेवा ॥ माझासंदेह
फेडावा ॥ कवण्यागुणेंकुबुद्धिजीवां ॥ हेंकेशवासांगाआधीं ॥ ४१ ॥

अथकेनप्रयुक्तोयंपापंचरतिपूरुषः ॥
अनिच्छन्नपिवार्ष्णेयबलादिवनियोजितः ॥ ३६ ॥ अ० ३ ॥

अर्जुनउवाच—तरीहेकैसेकवणगुण ॥ ज्ञानियाऐसेनागवितीपे
जघेऊन ॥ शांतिक्षमायांचीमानमोडून ॥ अभिमानआडरानेंधांवत
से ॥ ४२ ॥ सर्वज्ञसर्वउपावजाणती ॥ तेपरधर्मींव्यभिचारिती ॥

॥ ४ ॥

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

कवण्यागुणेंहेवर्तंती ॥ सांगनिगुतीहेंआह्मां ॥ ४३ ॥ ऐसाहाथारे, बलात्कारू ॥ तोकवणाचाआग्रहयेथेसधिरू ॥ हेंबोलावेंसर्वेश्वरू धरूनधीरूपार्थह्मणे ॥ ४४ ॥

श्रीभगवानुवाच—कामएषक्रोधएषरजोगुणसमुद्भवः ॥
महाशनोमहापाप्माविद्ध्येनमिहवैरिणम् ॥ ३७ ॥ अ० ३ ॥

तंवश्रीकृष्णपूर्णआत्माराम ॥ योगियांचेंनिजधाम ॥ तोम्हणेपुरुषोत्तम ॥ सांगेनतेंपरियेसीं ॥ ४५ ॥ तरीहेमुख्यत्वेंकामक्रोध ॥ येथेंकृपेचानाहींबोध ॥ हेकृतांतासारिखेशुद्ध ॥ असतीप्रत्यक्षपुढें उभे ॥ ४६ ॥ भजनमार्गाचेकेवळभेंद ॥ बोलमत्ताचेजैसेदुर्ग ॥ ईंद्रियेंकोठेंवाढवितीबंड ॥ ऐसेलंडकामक्रोधी ॥ ४७ ॥ हेंबीजरजोगुणतमाचें ॥ समूळअसुरविद्येचें ॥ अतृप्तजरींराज्यस्वर्गीचें ॥

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

अथवामहीचेंअधिपत्य ॥ ४८ ॥ कामक्रोधाचीवासनाकठीण ॥ हें
विश्वनपुरेघांसालागुन ॥ ऐशीदुर्धरवासनामलीन ॥ संतोषमिनन
सेकधीं ॥ ४९ ॥ जेंकवळूंजायस्वमुष्टी ॥ तेव्हांचवदाभुवनेंथेकुटीं॥
ऐशीमिथ्यामयभ्रांती ॥ कामक्रोधेंपाडिली ॥ ५० ॥ मायामोहअहं
कार ॥ तृष्णाज्याचेंमाहेरघर ॥ येणेंजगभुलविलेंसमग्र ॥ नाचवी-
चित्रनानापरी ॥ ५१ ॥ सत्यशांतिदुरीकेली ॥ मायामांगीणशृंगा
रिली ॥ तियेकरवींविटाळविली ॥ संतओळीआणिवृंदें ॥ ५२ ॥
वैराग्यवनवासाधाडिलें ॥ विवेकाअंधारींकोंडिलें ॥ संतोषवनास्ती
खूडिलें ॥ धैर्यपाडिलेंधरणीसी ॥ ५३ ॥ आनंदाचेंरोंपउपाटिलें ॥
बोधाआडरानींघातलें ॥ ऐसेहेगुणप्रबळझाले ॥ जेथेंगुंतलेब्रम्हा-
दिक ॥ ५४ ॥ तेचैतन्याचेअसतीजवळ ॥ एकपंक्तीधरिलीओळ ॥

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

निवडूंजातांबहुतखोल ॥ म्हणोनिबोलनिजवृत्ती ॥ ५५ ॥ तेआगी
वीणजाळिती ॥ पाण्यावीणबुडविती ॥ पैजघेवोनिमारिती ॥ ज्ञा-
नियासीसहजची ॥ ५६ ॥ तेचिखलावीणफसविती ॥ बळेंचिधरो-
निकोंबिती ॥ एवंकामक्रोधाहातीं ॥ जेसांपडतीतेंकर्म ॥ ५७॥ज्ञा-
नीजरीह्मणविसी ॥ परीअज्ञाननसांडिसी ॥ कामक्रोधराखिलेव-
स्तीसी ॥ तेंचत्यांसीअज्ञानत्व ॥ ५८ ॥ ऐसेहेकामक्रोधदुर्मती ॥
भलेभलेज्ञानियांचकविती ॥ अवतारादिकांपाडिलीभ्रांती ॥ कैशी-
विश्रांतीमानवां ५९ ॥ अर्जुनासावधहोवोनिऐक ॥ ह्मामायेचाप्रता
पसकळिक ॥ हीप्रसवलीतिन्हीलोक ॥ गुणसकळीकअवगुणातें
॥ ६० ॥ तेसमूळकथातुजस्वांगेन ॥ जेणेंबोधेतुझेंअंतःकरण ॥ मा
झीमायाअनिवारगहन ॥ माझीमजनावरेहे ॥ ६१ ॥

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

दैवीह्येषागुणमयीममायादुरत्यया ॥
मामेवयेप्रपद्यंतेमायामेतांतरंतिते ॥ १४ ॥ भ० ॥ ७ ॥

श्रीभगवानुवाच---हेपार्थामजपासूनसर्वजगझालें ॥ मुंगीपा सोनिब्रम्हांडओतिलें ॥ माझाचअंशपरीमजदुरावले ॥ गुणींगूंत-लेमायेच्या ॥ ६२ ॥ म्हणोनिमाझेचअंशहेईश ॥ ऐसेंम्हणतांना हींनाश ॥ परीआडकाठीमायापाश ॥ तेणेंजगासदुरावलों ॥ ६३ माझेमजपारखेझाले ॥ अज्ञानदशेंचूकले ॥ अहंमत्तेंबुडाविले ॥ वि षयांधझालेकीर्तनीं ॥ ६४ ॥ ऐशीहींचंचलमाझीमाया ॥ जैशीनि-दीभरलीदुथडिया ॥ जोउतरोनियेईलऐलथडिया ॥ तोचिप्रिय यामत्भक्ती ॥ ६५ ॥ परंतुहेंहोणेंमहाकठीण ॥ मायामोहक्रोधजा-ळून ॥ त्रिगुणसमपदींठेवून ॥ माझेंचध्यानकरीलतो ॥ ६६ ॥

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

पहाएकवेश्येचेसेवकझाले ॥ सदांतप्तरवचनींडोले ॥ विषयमगरें-
पूर्णगिळिलें ॥ व्यर्थगेलेंवयत्यांचें ॥ ६७ ॥ हळूहळूवृध्धापकाळआ
ला ॥ मगभ्रांतिभ्रमसहजचीझाला ॥ रांडापोरेंकरितीकंटाळा ॥ ऐ
शीदशाआलोदेहीं॥६८॥ऐसेंसुखांतदुःखझालें ॥ तोंजवळीमरणपा
तलें ॥ ज्वरादिनानादुःखेंगांजिलें ॥ मगचावळेभलतैसें ॥ ६९ ॥ए
कयज्ञाक्रियाकरिती ॥ स्वर्गसुखाचीव्हावीप्राप्ती ॥ अहंकारधरोनि-
चित्तीं ॥ जगींभुलवितीभलतया ॥ ७० ॥ एकमोक्षसाधनाच्यापं-
क्ती ॥ धरोनिकामातेंदुरावती ॥ विधीनिषेधाचीग्रंथी ॥ नसुटेअ-
र्थीअर्थभेदा ॥ ७१ ॥ ऐसेभवचक्रींपडले ॥ मायामोहींगुंतले ॥ ते
सहजचीमजमुकले ॥ दासजाहलेदासींचे ॥ ७२ ॥ तेथेंवैराग्याचें-
नांवनाहीं ॥ विवेकाचेंस्मरणपाहीं ॥ ऐशीमायानदीकांहीं ॥ जीवां

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

सतीआवरेना ॥ ७३ ॥ जैशीसकामीपुरुषासवनिता ॥ आवरेना
बरेयत्नकरितां ॥ तैशीहीमायामयसरिता ॥ याजीवितानातरे॥७४
परीअसेयेथेंएककारण ॥ जोभाग्यनिधीगुरूसेवेलावीध्यान ॥ सत्व
गुणेंमजअनन्यशरण ॥ तयाचेंस्मरणमजअसे ॥ ७५ ॥ तोचयेथेंत
रोनितारील ॥ जेणेंशोधिलेंअंतरमूळ ॥ बाहेरजैसाचंद्रशीतळ ॥
तोचकृपाळगुणतारूं ॥ ७६ ॥ हेंवचनमाझेंसत्य ॥ पार्थातूंयेथेंलक्ष
ठेवींनित्य ॥ शोधोनिपहासर्वआपत्य ॥ अवघेमिथ्यासारिखे॥७७
आतांअसोहेमायाजाळ ॥ पुरेपुरेहापाल्हाळ ॥ जेणेंमायाभ्रमदुरा
वेल॥त्याचेंमूळसांगूंतुज॥७८॥आतांयागुणाचाप्रकारू॥तुजकरूंगो
चरू ॥ सावधहोऊनिधरींधीरू ॥ होयस्थिरूवीरवृत्ति ॥ ७९ ॥

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

नदद्दस्तिपृथिव्यांवादिवीदेवेषुवापुनः ॥
सत्वंप्रकृतिजैर्मुक्तंयदेभिःस्यात्रिभिर्गुणैः ॥ ४० ॥ अ० ॥ १८

श्रीभगवानुवाच—अर्जुनाकर्ताकर्मआणिक्रिया ॥ हीचत्रिपुटी-
गुणमाया ॥ आनादिसिद्धप्रगटावया ॥ जैशीक्रियातोगुण ॥ ८०
गुणस्थूलनासुक्ष्मन ॥ दोहींमध्येंराहिलासम ॥ जैसेखळाळपा-
ण्यावीण ॥ नोहेभिन्नतयापरी ॥ ८१ ॥ अथवावस्त्राशीतंतुआ-
धार ॥ त्यावांचूनिपटनाहींहोणार ॥ पाहातोकांबळासुंदर ॥ परी-
आधारलोंकरीचा ॥ ८२ ॥ ऐसेहेरजतमसत्वगुण ॥ त्रिगुणात्मक-
त्रिविधपण ॥ मायाग्रस्तजगसंपूर्ण ॥ संयोगेंगुणप्रगटहोती ॥८३
जैशीजैशीक्रियानिपजे ॥ तैसेंगुणीगुणाजाणीजे ॥ जेणेंजेणेंजैसेंध्या-
यिजे ॥ तैसेंहोयिजेमजपार्था ८४ रजोगुणब्रह्मेंस्वीकारिला ॥ त-
मोगुणशंकरेंमानिला ॥ सत्वगुणेंविष्णुसाधिला ॥ ऐसाजाहलावि-

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

भागीहा ॥ ८५ ॥ तेपिंडब्रह्मांडअंडीं ॥ रचीमायागुणप्रचंडी ॥
तिनेंलाविलेधुंडाधुंडी ॥ गाळिलेपिंडीदेहसारे ॥ ८६ ॥ जैसेंमा-
ळियेंबींपेरिलें ॥ तेंजीवनामिळतांबाहेरआलें ॥ त्यासजेपल्लवफुटले
तेपाहिलेत्रिगुणी ॥ ८७ ॥ हेंप्रत्यक्षसकलांगोचर ॥ दिसतआहे-
निरंतर ॥ तैसेंचहेगुणसविस्तर ॥ सकळविस्तारबीजाचा ॥ ८८
तेंबीजशुद्धसत्वांशीअखंडपूर्ण ॥ ह्मणोनिस्वीकारिलेंदेवेंआपण ॥
रजतमेंदोन्हीक्रोधकृपण ॥ दिधलेमानवदानवां ॥ ८९ ॥ तिस-
राजोसत्वगुण ॥ तेसाधुसंतमहंतपूर्ण ॥ यागुणाचेंस्वरूपलक्षण ॥
शांतपणमोक्षाधिकारी ॥ ९० ॥ हेअवतारत्रिगुणमूर्तिमंत ॥
साक्षात्श्रीगुरूदेवदत्त ॥ ज्याचामहिमात्रिभुवनांत ॥ जगादैवत-
मुख्यहें ॥ ९१ ॥ तोत्रिगुणधारीकैलासनाथ ॥ तमरूपीलीलादा

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

वित ॥ पूर्णवैष्णवदयाभूत ॥ करीसनाथअनाथदीना ॥ ९२ ॥ कृ
पेचासागरदयाळूऐसा ॥ रिपूमित्रदोघांतैसा ॥ मानअपमानविचा
रकांहींसा ॥ स्मशानवासीआनंदरूपी ॥ ९३ ॥ ऐसेहेगुणपरमउ-
चित ॥ पिंडब्रम्हांडत्रिगुणगोळित ॥ भेदमानणेंहेंअनुचित ॥ प
रीगुंतलेगुणमायेंत ॥ ९४ ॥ विषयलोभेंगुणउत्पत्ती ॥ नाहींतरीगु
णनाव्यक्ती ॥ क्रियाकर्मआपणचहोती ॥ करितीकीर्तिकर्त्याची
॥ ९५ ॥ कर्त्यापासूनिजीक्रियानिघाली ॥ तीफलांशीरसेंभरली ॥
त्याचीजिव्हेनेंपरीक्षाकेली ॥ गुणाआणिलीगुणत्वें ॥ ९६ ॥ यानां
वगुणाक्रियाउत्पत्ती ॥ इच्छाहोणेंहीगुणशक्ती ॥ तेचगुणरूपतयाह्म
णती ॥ ऐसेंश्रुतिगर्जती ॥ ९७ ॥ वेदत्रैगुणीझाले ॥ तेचत्रैलो-
क्यगुणींगुंफिले ॥ चारवर्णींगुणओतिले ॥ जेजेआलेविधिमतें ॥ ९८

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

तेचब्राह्मणक्षत्रीयवैश्यशूद्र ॥ चारीवर्णाश्रमधर्मपवित्र ॥ धर्मनीति न्यायचारित्र ॥ गुणेंपवित्रगुणकारी ॥ ९९ ॥ अर्जुनाहागुणधर्मउत्तम ॥ नित्यविचारेंवाढवींप्रेम ॥ जेणेंभेटेलपुरुषोत्तम ॥ सांगतोंनेमतुजआतां ॥ १०० ॥ आतांपुढीलअध्यायींनिरूपण ॥ चारीवर्णक्रियालक्षण ॥ श्रवणकरण्यासतूंपरमपावन ॥ परीहेंवचनजतनकरीं ॥ १०१ ॥ ऐसेंनारायणेंजेंकथिलें ॥ तेंऐकोनिअर्जुनाचेंमनसंतोषलें ॥ आतांपुढेंबोलावेंहेंसूचलें ॥ तेंजाणितलेंआदिदेवें ॥ १०२॥ पार्थातुझाहेतूमीजाणिला ॥ चारीवर्णांतत्रिगुणमिसळला ॥ हाबोलकैसाजाहला ॥ हाचगलबलातुझेमनीं ॥ १०३ ॥ तरीमीसांगेनशुद्धस्फटिक ॥ जैसेंमोतींएकवट ॥ जेणेंबुद्धिहोईलधीट ॥ करीआलोटयागुणीं ॥ १०४ ॥ तेंवचनप्रेमळगीताशास्त्र ॥ श्रीज्ञानेश्व

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

रीमहामंत्र ॥ कुपात्रांकरीसुपात्र ॥ परमपवित्रधन्यजगीं ॥ १०५॥
ज्ञानदेवेंपायाघातला ॥ सकळसंतांलाभझाला ॥ पूर्णापूर्णसद्गुरू
धाला ॥ ब्रम्हांडालास्वबोधी ॥ १०६॥ संतसाधूमायबाप ॥ तेअ-
खंडआनंदीसंतोषरूप ॥ दयाक्षमाशांतीसकृप ॥ जडजीवपापदूर
करी ॥ १०७ ॥ अहोश्रीगुरूरायापावना ॥ संतसाधूथोरलहाना ॥
दानद्याइतुकेंदीना ॥ ह्याग्रंथश्रवणासी ॥ १०८ ॥ तुह्मीसर्वज्ञचतु
रपंडित॥अर्थज्ञानीमहाभागवत॥ अज्ञानपामरशरणांगत ॥ द्यासु
बुद्धिताचित्ता ॥ १०९ ॥ श्रीनामयावरदापांडुरंगा ॥ भीमातटवा-
सीश्रीरंगा ॥ निजात्मभावालावींरंगा ॥ निर्मळअभंगापरासरा
॥ ११० ॥ इतीश्रीस्वबोधगुणमालिका ॥ संमतश्रीज्ञानदेवीटी-
का ॥ मायागुणविस्ताराविवेका ॥ द्वितीयोध्यायींकथियेलें ॥ १११॥

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ओव्यांचीसंख्या- -१११ ॥

।स्व,गु

अ०२।

॥१०॥

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

श्री० ज्ञानराजमाउली.

॥ अथश्रीस्वबोधगुणमालिकाअध्याय३ प्रा० ॥

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्येनमः ॥ श्रीगुरुसमर्थ ॥
॥ जयजयाजीगणेंद्रा ॥ विश्वविकासाज्ञानसमुद्रा ॥ सोडींतुझी
योगनिद्रा ॥ प्रकाशरुद्रानमोंनमः ॥ १ ॥ त्रिगुणत्रिपुरवि-
नाशा ॥ जीवदुर्गापरमहंसा ॥ सकळमंगलामंगलधीशा ॥ सुरा
असुराएकतूं ॥ २ ॥ तूंपरात्परत्रिभुवननायक ॥ गणेशनामेंगुणदा-
यक ॥ प्रेममंगलज्ञानदायक ॥ दिगांबराआदिमूर्ति ॥ ३ ॥ तूंवि-
श्वात्मकविश्वशक्ति ॥ ज्ञानाचीज्ञानजोती ॥ आगमागमश्रुतिध्या-
ती ॥ परिस्थितीनकळेतुझी ॥ ४ ॥ घुंगरूनादप्रवणतालें ॥ देव-
दानववेडावले ॥ तांडवनृत्यपददावलें ॥ कळादाविलीनिजमायें
॥ ५ ॥ तूंसकळासकळजाणतारावो ॥ सिद्धानकळेतुझाठावो ॥
सर्वज्ञपणेंसर्वभावो ॥ निजरुपींराहोतुझीये ॥ ६ ॥ मौन्यगा-

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

तुझेंराज्ञीनांव ॥ श्रोतेसाधूनींघेतलीधांव ॥ दिसेतितुकीआवघी माव ॥ धराभावगुरुवचनीं ॥ ७ ॥ श्रीगुरुज्ञानांजनसत्वशीळ ॥ मोक्षमार्गाचेंतारूंसबळ ॥ साधकेंसाधोनिसेवाबळ ॥ राखावी निर्मळवासना ॥ ८ ॥ देखोदेखींसेवकुजाहले ॥ परीभेदद्रोहसंशयींबुडाले ॥ मगसहजचीमोक्षमार्गचुकले ॥ ओळखीनाभलेभक्तीशीं ॥ ९ ॥ गुरुनिष्कर्मज्ञानघन ॥ अभेदजैसेंजळींलवण ॥ मिळालीयाएकरुपपरीपूर्ण ॥ ऐशीयानमनसर्वभावें ॥ १० ॥ श्रीकृष्णार्जुनसंवादबोली ॥ गीताज्ञानदेवीअगम्यओली ॥ गुणक्रियावर्णाश्रमजाळीं ॥ श्लोकार्थरसमेळींश्रवणकरा ॥ ११ ॥

॥ ब्राम्हणक्षत्रीयविशांशुद्राणांचपरंतप ॥
॥ कर्माणिप्रविभक्तानिस्वभावप्रभवैर्गुणै ॥ ४१ ॥ अध्याय १८ ॥

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

आतांकरूंनिरूपण ॥ चारखाणीचारीवर्ण ॥ प्रथमधुरेचेब्रा-
ह्मण ॥ मुखमासींतेजाहले ॥ १२ ॥ दुसरेक्षत्रियबाहुभूषण ॥ तिसरे
वैश्यहृदयरत्न ॥ चौथेशूद्रसेवेकारण ॥ हेप्रमाणवर्णचारी ॥ १ ॥
सर्वांमाजीश्रेष्ठब्राम्हण ॥ जेवैदीकविधानीह्मणोन ॥ त्याचेआज्ञेंत
तत्परराहणें ॥ हेमान्यकरणेंक्षत्रीयवैश्यां ॥ १४ ॥ चौथाशूद्रजोह्म-
णितला ॥ वेदलागूनाहींत्याला ॥ परितिन्हीवर्णवृत्तीवेगळा ॥
जवळकेलाश्रूतीनें ॥ १५ ॥ जैसातंतुआधारेंहारगुंफिला ॥ तोतंतु
सहजअदृश्यराहिला तोचिहारश्रीमंतोंस्विकारिला ॥ तुरालाविला
निजमस्तकीं ॥ १६ ॥ तैसेद्विजआणिशुद्रभाव ॥ हावेदमतेंवेतला
ठाव ॥ परीभेदाभेदक्रियेचासर्व ॥ एरवींभावसिद्धची ॥ १७ ॥ तिन्ही
गुणच्यारीवर्ण ॥ हेंमृत्युलोकींचेंप्रावर्ण ॥ भगवद्भजनींलावोनिध्या

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

न ॥ ब्रह्मसनातनसाह्यकारी ॥ १८ ॥ चारीवर्णचारीधर्म ॥ चौ-
ठाईंविभागिलेतिन्हींगुण ॥ जैसेंबापेंजोडिलेंधन ॥ पुत्रसुखाकारणें
॥ १९ ॥ तैसीती प्रकृतिगुणाव्याली ॥ त्यांतस्वकर्मेसाह्यजाहलीं ॥
जैसीक्रियातैसीबोली ॥ करीसाउलीजीवावरी ॥ २० ॥ प्रथमसत्व
गुणउत्तमएक ॥ तेब्राह्मणआणिक्षत्रियलोक ॥ तिसरेवैश्यत्यांसर
जसात्विक ॥ परमधार्मिकइहलोकीं ॥ २१ ॥ चौथाशुद्रजोधनंजया ॥
रजतमामिश्रदोन्हींगुणतया ॥ स्वधर्मआचरणसेवातया ॥ तिन्हीव
र्णांकारणें ॥ २२ ॥ जैसेप्राणीयाजीवनएक ॥ त्याजीवनेंरक्षिलेतिन्ही
लोक ॥ तैसामीसर्वभूतसार्वात्मक ॥ नाहींभेदमाझेठायीं ॥ २३ ॥
जोस्वधर्मीसत्वगुणीभला ॥ तोमाझासखाभक्तजाहला ॥ तोमीहृ-
दयकमळींवाहिला ॥ जतनकेलाबहुसाल ॥ २४ ॥ अर्जुनाहेंसत्व

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

गुणदेहींपवित्रपण ॥ कवणसभाग्यालागेलध्यान ॥ पूर्वजन्माचेठेवण ॥ त्यांपुण्येंसहजमिळेल ॥ २५ ॥ जैशीआपलीवस्तुआपण ॥ दीपप्रकाशेंठेवीलक्षून ॥ मागुतीदीपनसतांघेउचलून ॥ कायअडचणसांगबापा ॥ २६ ॥ तैसेंकर्मगुणींभिन्नकेलें ॥ नानापरीवेटाळिलें ॥ परीशास्त्रेंनिर्मळदाविलें ॥ तेंअवलोकिलेंसंतजनीं ॥ २७ ॥ आतांवर्णवीहिताचेंलक्षण ॥ सांगतोंअर्जुनाकरींश्रवण ॥ जेंसौभाग्यनिधीआणिभवमोचन ॥ ऐसेंहेंज्ञानतुजसांग ॥ २८ ॥

शमोदमस्तपःशौचंक्षांतिरार्जवमेवच
ज्ञानंविज्ञानमास्तिक्यंब्रह्मकर्मस्वभावजम् ॥ ४२ ॥ आ० १८ ॥

हेसव्यसाचीज्ञानघना ॥ चित्तदेईंमाझियावचना ॥ परमाप्रियकरज्ञाना ॥ जेणेंसज्ञानासुखहोय ॥ २९ ॥ वर्णांतश्रेष्ठब्राम्हण ॥

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

त्याब्राम्हणासीअसतीनऊगूण ॥ त्यागुणेंतोमंडितपूर्ण ॥ म्हणोनिब्रा
म्हणत्यानांव ॥ ३० ॥ तेगुणमंडितलक्षणें ॥ साळंक्रतशुध्धवचनें ॥
भेदाभेदलक्षणें ॥ सवगुणतेऐका ॥ ३१ ॥ प्रथमगुणउत्तमशम ॥
त्याशमाचाअर्थसुगम ॥ उगमसनाचालावुनीसम ॥ विषमधुवोनी
टाकीले ॥ ३२ मगसर्वइंद्रियांच्यावृत्ती ॥ एकेठाईजेव्हांमिळती ॥
जैसीप्रियाप्रियोत्तमाप्रती ॥ लक्षठेवितेतैसेंहें ॥ ३३ ॥ यानांव-
बुध्धिआत्माविचारकरी ॥ म्हणेचुकलोंहोतोंबहुतदुरी ॥ आतांखेळुं
हृदयमंदिरीं ॥ सहपरीवारींजीवशिवीं ॥ ३४ ॥ ऐसालक्षणयुक्तब्रा
म्हण॥हेंशमगुणाचेंलक्षण ॥ आतांदुजेंदमलक्षण ॥ तेंसंपुर्णसांगतों
॥ ३५ ॥ किर्तनभजननामस्मरण ॥ सर्वइंद्रियेंस्थिरराहून ॥ एका
ग्रसाधीसमसाधून ॥ दमलक्षणयानांव ॥ ३६ ॥ आणिसदासर्व

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

काळ ॥ चित्तजैसेंगंगाजळ ॥ आधर्मासीतिळभर ॥ धारानाहींत्या
देहीं ॥ ३७ ॥ ऐसाएकपत्नीउत्तमगुण ॥ इंद्रियांदमनहेंलक्षण ॥ -
आतांऐकेंसावधान ॥ गुणलक्षणतीसरें ॥ ३८ ॥ तिसरेगुणानांव-
तप ॥ तेंतपजैसेनंदादीप ॥ अजपीजपणेंसोहंमाप ॥ स्वरुपींतृप्त-
नाममुखीं ॥ ३९॥ जैसीबाळंतीणअसतांघरीं ॥ सटवीपुजानेमकरी ॥
दीपरक्षावापरोपरी ॥ हीअंतरींवासना ॥ ४० ॥ मुख्यत्वेंहागुणतै-
सा ॥ लक्षलक्षांशींहाधर्मएसा ॥ हेंचितपगागुणपरेशा ॥ प्रियमान-
साप्राणघना ॥ ४१ ॥ आतांचौथागुणशौच्यपार्था ॥ शुद्धचैतन्यस्प
टिकआर्था ॥ एकात्मसमरसपरमार्थ ॥ दुजेस्वधर्मभुषणीं ॥ ४२ ॥
यादोहींमाजींएकउत्तम ॥ भावशुद्धस्वधर्मनाम ॥ जेणेंसंतोषेपुरु
षोत्तम ॥ हेंउत्तमोत्तमब्रह्मगुणी ॥ ४३ ॥ यानांवशौच्यलक्षण ॥ तुज

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

केलेंनिवेदन ॥ आतांपंचमगुणाचेंचिन्ह ॥ तीशांतीगुणसत्वशील ॥ ४४ ॥ जैशीपृथ्वीशांतघन ॥ अरिमित्रसज्जनींसमान ॥ दुर्गंधीसुगंधकरीपावन ॥ हेंश्रेष्ठलक्षणतीशांती ॥ ४५ ॥ अखंडआनंदींहृदयधारणा ॥ येणेंचुकेजन्मयातना ॥ मगतूंसहजपरब्रभूवना ॥ सुखासनापावशील ॥ ४६ ॥ शीतलशांतीसुखआंगींबाणे ॥ हीं तोभाग्याचींउदयलक्षणें ॥ दुःखसोसूनिसुखदेणें ॥ देहाझिजविणें परमार्था ॥ ४७ ॥ शांतीहीपरमार्थाचीठाणदिवी ॥ पूर्वदत्तेंधरीसत्संगाजिवीं ॥ पूर्वदत्तेंसाधेलप्रकाशरवी ॥ चिंतनींगोंवीशांतिजपी ॥ ४८ ॥ ऐशियाजगेंनिंदिलेंअथवावंदिलें ॥ परीतेंअंतरींनाहींभ्रमलें ॥ अक्षयीआनंदरूपींबैसलें ॥ सूखीकेलेंआणिकांसी ॥ ४९ ॥ जरीआकाशमस्तकींपडेल ॥ ऐसाभावजरीअंतरींजडेल ॥ तरीधीरनसोडीं-

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

अणुमात्र ॥ ऐशासपात्रशांतदेही ॥ ५० ॥ भलतेनेंभलतैसेंकरावें ॥
मनायेईलतेंबोलावें ॥ परात्यासीप्रत्युत्तरनद्यावें ॥ हाचिभावधरि-
शांती ॥ ५१ ॥ आपणश्रेष्ठब्रह्मणोनिमानावें ॥ तेंनमानितांमूर्खेंजा-
चावें ॥ भलत्यापरीजिवापीडावें ॥ परीतोअंतरींसदासुखी ॥ ५२ ॥
ऐशीनानाशब्दकडसणी ॥ जिवासाठींपडेघसणीं ॥ नबोलोनिझा-
लामौनी ॥ शांतसदनींनामसुखीं ॥ ५३ ॥ मुख्यशांतिसुखाचेंतारूं ॥
जेणेंपरमार्थहोयगोचरू ॥ हापुरुषार्थमहाराजमेरू ॥ जगतारूजी-
वरुपी॥५४॥अथवावैरीजरीझाला॥ त्यानेंभलतैसामारादिधला ॥ तो-
चसज्जनब्रह्मणोनिआलिंगिला ॥ निर्वैरमानिलाअंतःकरणीं ॥ ५५ ॥
कठीणशांतिरूपलेणें ॥ ऐशींअनेकबुधलक्षणें ॥ हींसंतसाधुअनु-
भवीजाणे ॥ इतरनजाणेसहजची ॥ ५६ ॥ याशांतिसुखाचाअभ्या-

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

स ॥ कैसेनिकळेअज्ञानास ॥ जोकृष्णेंकथिलाअर्जुनास ॥ तोचिश्रोते
श्रवणकरा ॥ ॥ ५७ ॥ प्रथमउपासनानामावळी ॥ तेणेंज्ञानासी-
डिरीफुटली ॥ ज्ञानेंज्ञानाचीगुढीउभारिली ॥ अबोलबोलीध्यान
जें ॥ ५८ ॥ ध्यानसाजिरेंगोजिरें ॥ हृदयींसांठिवलेंबरें ॥ तेणेंक-
र्मदुरीदुरे ॥ मगफलत्यागनुरेसहजची ॥ ५९ ॥ फलत्यागदुरीध-
री ॥ मगशांतीयेहृदमांदिरीं ॥ ऐशीहीशांतरूपाचीपरी ॥ परमा
र्थसाउलीआदिमाता ॥ ६० ॥ ऐशीशांतरूपीमाया ॥ तुजसांगि-
तलीधनंजया ॥ आतांआर्जवगुणलक्षणठाया ॥ पृथकरायासांग-
तों ॥ ६१ ॥ आर्जवाचेंहेंलक्षण ॥ अरीमित्रदोघांशरण ॥ नाहीं
तेथेंउच्चनीचपण ॥ समसमानअंतरीं ॥ ६२ ॥ जगींसर्वांसींन-
म्रराहणें ॥ आर्जवींशक्तीगोडबोलणें ॥ कोणाचेंअंतरनदुखवि-

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

णें ॥ हाउपायआर्जवीं ॥ ६३ ॥ ऐसाहासहावागुण ॥ तुजसां-
गितलानिवडून ॥ आतांसातव्याचेंऐकेंलक्षण ॥ तेंज्ञानकौणपरी
॥ ६४ ॥ ज्ञानम्हणजेस्वधर्मराखणें ॥ शास्त्रआचारविधिदानें ॥
ईश्वरींविश्वासठेवणें ॥ नीतिनेमपाहणेंअखंडित ॥ ६५ ॥ जैसें-
पाणीप्रयत्नेंकरून ॥ माळीघालीझाडालागुन ॥ कींसुंदरफळेंयेती
लगुणी ॥ याचिंतनींहाधर्म ॥ ६६ ॥ तैसागुरुवचनींविश्वास ॥
सत्यमानावेंभगवंतास ॥ सर्वांकरवींकरावाउल्हास ॥ होउनीउदा-
सनामस्मरणीं ॥ ६७ ॥ एकावांचूनिदुजेंनाहीं ॥ ऐसाभरवसाअंत
रदेहीं ॥ श्रीगुरूपासनादृढधरींपाहीं ॥ प्रीतीवाढवावीसंतजनीं
॥ ६८ ॥ यानावअर्जुनाज्ञान ॥ आतांऐकेंविज्ञानीलक्षण ॥
हाआठवागुणविस्तीर्ण ॥ तुजनिवेदनकरूंपार्था ॥ ६९ ॥ विज्ञान

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

म्हणजेमार्गसूक्ष्म ॥ तत्वलक्षणेंहामूळउगम ॥ सर्वगुणांतहामुख्य धर्म ॥ यादेहावर्मतेंविज्ञान ॥ ७० ॥ हेंचिसाधावेंपरोपरी ॥ श्री गुरुवचनहृदयींधरीं ॥ नाहींतरीव्यर्थसंसारीं ॥ पशुसमानजडदेह ॥ ७१ ॥ ध्यानधारणास्मरणलक्षण ॥ बुद्धिनिश्चयात्मकसंपन्न ॥ इ-श्वरतत्वींमिळेहेंप्रमाण ॥ ह्मणोनिजतनकरादेहीं ॥ ७२ ॥ अहो-तत्वज्ञानीतेपरमपावन ॥ तेश्रीगुरुघरचेंशुद्धअंजन ॥ यालागींअ नन्यशरण ॥ श्रीगुरुचरणधरावेगीं ॥ ७३ ॥ तत्ववेत्तेजेपुरुषजनीं तेनउमगतीकवणालागुनीं ॥ परीसंतसंगेंनिशिदिनीं ॥ भाग्यो-दयाजिवींलाभेल ॥ ७४ ॥ जरीऐसाअनुभवझाला ॥ मगनसोडावें त्याचियापाउलां ॥ तोचमोक्षदाताजगींभला ॥ परमार्थलोटिलाते णेंचकीं ॥ ७५ ॥ ऐशीहीविज्ञानभक्ती ॥ तुजसांगितलीयथारि-

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

ती ॥ आतांएकलक्षणअसेनिती ॥ त्याचीस्थितीश्रवणकरीं॥७६॥
आस्तिक्यहानववागुण ॥ जेविश्वासेंराखावेंमन ॥ पळपडूंनेदीअं-
तःकरण ॥ हेंप्रमाणअस्तिक्यीं ॥७७॥ जैशीराजयेंमुद्रास्थापिली॥
तीप्रजेसमान्यकरणेंभली ॥ आदरेंनीतसिवनकेली ॥ प्रीयवोली
स्वामीची ॥ ७८ ॥ तैसेंशास्त्रेंस्विकारिलेंज्यासी ॥ आपणप्रीतिनें
मानावेंत्यासी ॥ ह्याचियोगआस्तिक्यबुद्धीसीं ॥ जाणगुणराशीश्वेत
वाहना ॥ ७९ ॥ ऐसेहेटीकलगनऊगुण ॥ ब्राह्मणपावलाब्रह्मभुवन
ज्याच्याहृदयींजगज्जीवन ॥ अखंडभजनींभरलाअसे ॥ ८० ॥ ऐ
सेजेभगवत्स्वरूपब्राम्हण ॥ तयांसिप्रेमेंजावेंशरण ॥ तेसोडवि
तीवंधनापासुन ॥ हेंवचनश्रीचेंसत्यगितीं ॥ ८१ ॥ जैसासूर्यप्र
गटतांमेदिनी ॥ अंधारपळेमुळींहुनी ॥ तैसेहेनऊगुणरत्नमणी ॥

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

सौभाग्यजनीत्याब्राम्हणा ॥ ८२ ॥ ऐसेंहेंनवगुणमालिकारत्न ॥
ब्राम्हणकंठींलेइलाआपण ॥ तेणेंशोभलेंहृदयललाटनयन ॥ समस
मानसमदृष्टी ॥ ८३ ॥ ऐसेंदेवाधिदेवबोलिला ॥ अर्जुनऐकोनिसंतो
षपावला ॥ म्हणेआणीकपुढतीबोला ॥ क्षत्रियधर्मतोकैसा ॥८४॥
तेंपुढीलअध्यायींनिरूपण ॥ श्रीभगवानसांगेअर्जुनालागुन ॥ पर
मसुंदरकथागहन ॥ प्रियपावनसकलजिवां ॥ ८५ ॥ जोमायालाघ
वीरुक्मिणीकांत ॥ त्याचीचिमायाहीअंगभूत ॥ तीचारखाणीव्यालीप्र
शस्त ॥ हेंश्रुतिवेदांतांअसेंठावें ॥ ८६ ॥ त्रिगुणीओगरलीबुद्धिजिवीं
स्थावरजंगमींचंद्ररवी त्रिगुणरूपमायामाधवीं ॥ धन्धन्याजिवींआ
दिमाता ॥ ८७ ॥ हीत्रिगुणीइच्छाकैशीनटली ॥ जगाउपदेशबो-
ल बोली ॥ गुणींगुणंगुंडाळली ॥ जीमनींमानिलीतोंचिफळ ॥ ८८

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

सत्वगुणींमानिलोमाया ॥ तोब्रम्हवृतरारवीपातया । धनलोभमुळिंहु
नियां ॥ टावपुशिलातयानें ॥ ८९ ॥ सदाभजनींअखंडध्यान ॥
आनंदींज्याचेंस्थीरमन ॥ तोचिप्राणियावासनेपासोन ॥ झडझ
डोनिदुरीराहे ॥ ९० ॥ दुजीरजोगुणीमायाकामिन ॥ लेणेंनेसणें
विषयवासना ॥ सदाभोगीआसनीशयना ॥ कोणजपध्यानाओळ
खी ॥ ९१ ॥ कैचेंध्यानकैचेंभजन ॥ अखंडविषयाचेंचिंतन ॥ नसु
चेकांहींभगवत्कीर्तन ॥ ऐसाहारजोगुणओळखावा ॥ ९२ ॥ तिस
रातमोगुणमायाबुद्धी ॥ तीअखंडअहंमतशोधी ॥ कामक्रोधघेऊनी
खांदीं ॥ पोतानिजछंदींनाचवां ॥ ९३ ॥ ऐसेहेसत्वरजतम ॥ तेसं
तींशोधिलेमुळींहुन ॥ ह्मणोनिसेवावेतयांचेचरण ॥ तेचिपावनकर
तील ॥ ९४ ॥ श्रीगुरुरायेंदयाकेली ॥ तेणेंगुणमालीकाआरंभि-

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

ला ॥ जेणेंआत्म्याहोयसुखसावली ॥ प्रेमबोलीरसभरणीं ॥ ९५॥ अंतरींप्रेमवाढोपूर्ण ॥ बाहेरीसंसारकर्माधीन ॥ ऐशियेक्रियेचेंचिंतन ॥ लावींअनुसंधानभावबळें ॥ ९६ ॥ त्रिगुणाचीकरोनिगाळणी ॥ लक्षठेवावेंश्रीगुरुचरणीं ॥ तोचितारीलभवांतूनी ॥ भावमनींअसोंद्या ॥ ९७॥ श्रीपांडुरंगारुक्मिणीकांता ॥ कृपासिंधुविश्वानंता ॥ सिद्धीसन्यावीहिकथा ॥ प्रियपरमार्थालागूंद्या ॥ ९८ ॥ तुमचेआवडीचेंहेंसर्वलेणें ॥ नानाप्रकारीनगदागिने ॥ श्रीमंताघरींकायउणें॥ परीविनवणेंआहेतुम्हा ॥ ९९ ॥ तुम्हीमातापिताकुळगुरू ॥ प्राणसखेसहोदरू ॥ आणिभक्तिपंथासआधारू ॥ धन्यश्रीगुरुतूंमाय ॥ ॥ १०० ॥ तत्वगुणींसर्वमंडित ॥ सत्यधर्मीशुद्धभागवत ॥ इतकेंदानद्यावेंदीननाथ ॥ करासनाथपामरदीन ॥ १०१ ॥ श्रीनामदेव-

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

।स्व, गु

वरदापांडुरंगा ॥ भीमातटवासीज्ञानअभंगा ॥ पूर्णानंदपूर्णस्वरुपबो
धा॥ परात्पराज्ञानज्योती ॥ १०२ ॥ इतीश्रीस्वबोधगुणमालिका ॥
प्रीतीपावोपंढरीनायका ॥ब्राम्हणनवगुणशुद्धाविवेका ॥ त्रितीयोध्या
यींकथियेला ॥ १०३ ॥ पुं.



अ०

॥ ९

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

श्री० ज्ञानराजमाउली.

॥अथश्रीस्व.गुणमालिकाअ० ४ प्रा.॥

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

श्रीगणेशायनमः श्रीसरस्वत्यैनमः श्रीगुरुभ्योनमः जयजयाजीपरा
त्परा॥ विश्वरूपाविश्वेश्वरा॥ विश्वपावनादीनोद्धारा॥ कृपासागराग-
णपती ॥ १ ॥ विराटरूपाजनार्दना॥ जगन्नियंत्यानारायणा॥ आनं
दरूपाआनंदघना ॥ मूषकवहनागणरूपा ॥ २ ॥ सकळारंभींमूळ-
कर्ता ॥ चराचरव्यापकभूतां श्रुतीनेतिनेतिवर्णितां ब्रह्मींसत्तातुझी
चकीं ॥ ३ ॥ सकळकल्पितांकल्पनाना चतुर्भुजाचतुरानना ॥ चि-
त्तचालकासिंदूरभूषणा ॥ गौरीनंदनामायबापा ॥ ४ ॥ दोंदिलरू-
पापितांबरधारी ॥ पाशांकुशामकाभियकरी ॥ मस्तकींमुगुटाटिळा-
केंशरी ॥ जडजीवांतरींचालकतूं ॥ ५ ॥ अनंताविद्याधनुर्धरा ॥
अनंतनामाविश्वंभरा ॥ अनंतधामादीनोद्धारा ॥ परात्पराजगदी-
शा ॥ ६ ॥ अनंतरूपारूपेश्वरा ॥ अनंतचालकापरमेश्वरा ॥ अ-

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

नंतभूजाअनंतवीरा ॥ सुरांअसुरांअनंतातूं ॥ ७ ॥ अनंतनादाअ
नंतछंदा ॥ अनादिधर्मामूळपदा ॥ अनंतवीर्यातूंमुकुंदा ॥ लावींछं
दाआपुलिया ॥ ८ ॥ चारिदेहचारीवाचा ॥ चारीवेदचौरंगीपांचा
साहांचाअंतसत्पद्विपांचा ॥ ठावसाचालागेना ॥ ९ ॥ आठांपासोनी
निवाडाझाला ॥ तोनऊजणींअंगिकारिला ॥ दहाव्याचावेधलाग
ला ॥ परिभ्रमलामायासवें ॥ १० ॥ ऐसाहाभ्रमतुझेचरणीं ॥ अ
र्पणकरितोंजोडोनिपाणी ॥ चालवींकथाअनुसंधानीं ॥ अभयपा-
णीगुरुराया ॥ ११ ॥ जैसेंकायकळेबाळा ॥ बापसदैवदुबळा ॥
परिमागण्याचाघेवोनिचाळा ॥ पुरविणेंलळाअवश्यकीं ॥ १२ ॥
जेंजेंदेखिलेंअसेलदृष्टी ॥ तेंचिमागेउठाउठी ॥ बळेंझोंबोनियांकंठीं
॥ चालीमिठीपितयाच्या ॥ १३ ॥ मगतोपिताकायकरी ॥ जरी

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

कांहानसेआपुलेपदरीं ॥ तरीभलतेमिषेंनानापरी ॥ संतोषवीबाळ
का ॥ १४ ॥ ऐसातंमाझामातापिता ॥ समूळअंतःकरणजाणता ॥
ह्मणोनिचरणींठेविलामाथा ॥ चालवींकथापुढतपुढती ॥ १५ ॥
श्रीगुरुआज्ञेंउभारिलीकथा ॥ जेथेंअर्जुनप्रेमश्रोता ॥ श्रीकृष्णऐसा
निजवक्ता ॥ तेविवार्तापरिसाहो ॥ १६ ॥ मागीलअध्यायींकथा-
गहन ॥ श्रीकृष्णेंसांगितलेब्राम्हणगुण ॥ आतांक्षत्रियधर्मनिरूपण ॥
अर्जुनाप्रतीसांगतसे ॥ १७ ॥ तेचिज्ञानदेवीज्ञानमाता ॥ निवे-
दनकरितीझालीभक्तां ॥ तोचिअर्थघेऊनिचित्तां ॥ स्वात्मसत्ताचि-
चारधीरू ॥ १८ ॥ तयाश्रोतियांच्यावचनीं ॥ लक्षांशींदक्षराहा-
दृढमनीं ॥ मागेंनसरतांलागाध्यानीं ॥ मूळबंधनींबीजाक्षरें ॥ १९ ॥
अहोसंततुह्मीमायबाप ॥ केवळईश्वराचेंस्वरूप ॥ सिंहापुढेंजैसा-

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

जंबुक ॥ तैसाहादीनरंकअल्पमती ॥ २० ॥ परीतुमचेकृपामृततु-
षारीं ॥ पल्लवफुटतलिशाखांतरीं ॥ फळेंगोमटींसुंदरगोजिरीं ॥ कृ-
पाबळेंफळतील ॥ २१ ॥ तुम्हींशांतशीलज्ञानज्योती ॥ जरीबाळका
धरालहातीं ॥ तरींचपावेयशकीर्ती ॥ हेविनंतीदयाळा ॥ २२ ॥
आणिकएकमागणेंदातारा ॥ संतसंगेंभाग्योदयदोरा ॥ लागूंदेप्रे-
मानिजांतरा ॥ धराकराआदिदेवा ॥ २३ ॥ आतांश्रीगुरुआज्ञा-
चावळली ॥ कथाशृंगारिकमनींधरिली ॥ चालवींक्षत्रियधर्माची-
ओळी ॥ श्रीकृष्णेंआणिलीगुणासिती ॥ २४ ॥

॥ शौर्यंतेजोधृतिर्दाक्ष्यंयुद्धेचाप्यपलायनम् ॥
॥ दानमीश्वरभावश्चक्षात्रंकर्मस्वभावजम् ॥ ४३ ॥ भा० १८

श्रीभगवानुवाच—श्रीकृष्णम्हणेपार्थासी ॥ श्रवणकरींयागुणासीं

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

क्षत्रियधर्मपरियेसीं ॥ यथानिगुतीसांगेन ॥ २५ ॥ जेणेंघडेलपर-
मात्मादर्शन ॥ त्यामार्गाचेंऐकलक्षण ॥ सर्वधर्मांतपरमपावन ॥
शौर्यगुणप्रथमहा ॥ २६ ॥ जैसेंसूर्यतेजापुढें ॥ अंधारकायकरील-
बापुढें ॥ अथवासिंहम्हणेमजसींभिडे ॥ ऐसानदेखुंभूमंडळीं ॥२७ ॥
ऐसेंलाटेपणाचेंऐश्वर्य ॥ पूर्णआनंदनिर्भय ॥ चपळवर्गविधुहतेभा
य ॥ हागुणशौर्यक्षत्रियां ॥ २८ ॥ आतांऐकतेजलक्षण ॥ नक्ष-
त्रांसचंद्रआपण ॥ सूर्यप्रकाशहोतांपूर्ण ॥ तेजहीनआपोआप ॥२९ ॥
तैसातेजरूपरणधीर ॥ प्रौढप्रतापेंगुणगंभीर ॥ जयाच्यातेजेंपळ
तीवीर ॥ समरींधीरनधरिती ॥ ३० ॥ ऐसातेजरूपीदिसेक्रूर ॥
परंतुशोभनघेअंतर ॥ हेंदैवदशेंचेंभाग्यथोर ॥ कोणीसमोरनटिके
ची ॥ ३१ ऐसेंहेंतेजलक्षण ॥ आतांतृतीयगुणतोकवण ॥ त्याचें-

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

ऐकावेंलक्षण ॥ धीरपणत्यानांव ॥ ३२ ॥ धीरूतोऐसाजाणीजे ॥ सर्वप्रकारेंस्थीरराहिजे ॥ जरींनभ्रखड्गमस्तकींपडजे ॥ परिधीरन-सोडिजेसमरभूमी ॥ ३३ ॥ जरींआकाशकोसळेआंगावरी ॥ तरी-शद्वनानिघेबाहेरी ॥ बुद्धिगंभीरचतुरअंतरीं ॥ जैसामेरुदूसरा ॥ ३४॥ यानांवधीरगुण ॥ आतांचतुर्थगुणाचेंलक्षण ॥ तेंसांगूंतुजकारण ॥ दक्षत्वपूर्णत्यांनाव ॥ ३५ ॥ नानापरीचींसंकटेंअनेक ॥ पडलींजरी भयानक॥तरीजींकूनीअरीमहाकटक॥ सावधअंतरींसर्वदां ॥३६ ॥ जैसेंपाण्याबाहेरकमळ ॥ विकासमानअतिसुंदर ॥ तैसाक्षत्रिय-समरींवीर ॥ स्वच्छनिर्मळदिसेरणीं ॥ ३७॥ अथवाआकाशअं-बरीं ॥ सर्वांगोचरचराचरीं ॥ यानांवदक्षत्वबाणेंशरीरीं ॥ तयास-क्षत्रीयह्मणूंआम्हीं ॥ ३८ ॥ आतांऐकपांचवागुण ॥ जेणेंपावसी

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

समाधान ॥ क्षात्रीयांच्याकुळींझुंजणें ॥ युद्धकरणेंपानांव ॥ ३९ ॥
जैशींसूर्याचींफुलझाडें ॥ सदांसन्मुखसूर्याकडे ॥ तेवींसमोरशत्रू-
पुढें ॥ ठाकणेंघडेवीरांसी ॥ ४० ॥ ऐशालक्षणेंगुणमंडित ॥ रिपू
सींपाठनदावीबहिंव्रत ॥ धीरउदारधारणासंकेत ॥ नचुकेवेदांतध
र्मगुणीं ॥ ४१ ॥ ऐसाहापांचवागुण ॥ सकलपुरुषार्थांचेंजीवन ॥
आतांपरिसासहावेंलक्षण ॥ जेंसनातनधर्मराव ॥ ४२ ॥ धर्मेंदान
यशकीर्ती ॥ धर्मेंनरदेहाजयप्राप्ती ॥ धर्मेंसाधेपरलोकगती ॥ ऐ-
सेंश्रुतीबोभाती ॥ ४३ ॥ तोधर्मक्षत्रियेंमानिला ॥ दारिद्राचाठाव-
पुशिला ॥ संतुष्टप्रजाब्राह्मणांला ॥ इच्छितजेंत्यालातैसेंदे ॥ ४४ ॥
जसेंचंद्राचेंशुद्धचांदणें ॥ आवडेलत्यानेंपेंवभरणें ॥ तैसेंक्षत्रियाचें-
देणें ॥ उदारपणेंपरिमळ ॥ ४५ ॥ ऐसेंहेंसहावेंदान ॥ आतांऐकें

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

तोसातवागुण ॥ जोईश्वरींभावोप्रमाण ॥ तेंलक्षणसांगतों ॥ ४६ ॥
जैसेआपुलेशरिराआपणधनी ॥ तैसेप्रजेचेमनोरथमानी ॥ रक्ष
णार्थलक्षीक्षत्रियगुणीं ॥ संतोपजनींकरणेंतया ॥ ४७ ॥ प्रजेसीं
पुत्रवत्पाळणें ॥ अथवासंसारींहितकरणें ॥ जेणेंप्रजासुखीहीं-
साधनें ॥ ऐशालक्षणेंदक्षप्रभू ॥ ४८ ॥ आत्मापरात्माविचार ॥
यानांवराज्यनीतिसाचार ॥ नाहींतरीव्यर्थबाजार ॥ पोकळविचा
रजिव्हेचा ॥ ४९ ॥ ऐसेहेसप्तगुणवरिष्ठ ॥ तोक्षत्रियसुपात्रश्रेष्ठ ॥
सर्ववीरांमाजीवलिष्ठ ॥ ऐसेंस्पष्टवचनमाझें ॥ ५० ॥ ऐसेहेसप्त
गुणदैदीप्यमान ॥ नक्षत्रींसप्तऋषिशोभतीपूर्ण ॥ अथवासप्तगं-
गेचेसंगमींस्नान ॥ करितांपावनहोतीजीव ॥ ५१ ॥ ऐसेगुणीक्ष
त्रियथोडे ॥ लक्षांतएकनिवडे ॥ ह्मणोनिसुरवरत्याचेंपवाडे ॥ वा

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

डेंकोडेंवर्णिती ॥ ५२ ॥ तोसत्वसोनियाचाचामरू ॥ सर्वांभरणें
अलंकारू ॥ सर्वसुखाचाभास्करू ॥ महीवरीप्रगटला ॥ ५३ ॥
धन्यत्याचीमातापिता ॥ धन्यगुरुकुळदेवता ॥ धन्यसंसारींअसो
निचिंता ॥ समतासमबुद्धिठेविली ॥ ५४ ॥ ऐसाहासत्यगुणीनरें
द्र ॥ जैसेमहीवरीसप्तसमुद्र ॥ धीरवीरउदारमनगजेंद्र ॥ जैसा-
चंद्रशीतल ॥ ५५ ॥ हेंनैसर्गिकगुणकर्म ॥ शौर्यादिक्षत्रियांचेनें-
म ॥ ऐसेंसंधानलावूनिसम ॥ तेंहेंवर्मस्वधर्मी ॥ ५६ ॥ हेप्राणस
खयाअर्जुना ॥ तूंसावधकरींआपुलाआत्मा ॥ हातींघेईंवाधनुष्य-
वाणा ॥ जेणेंदुर्जनांपळसुटे ॥ ५७ ॥ वीरवृत्तींचिलेवोनिकवच ॥
सज्जहोईंगातूंयुद्धास ॥ सांडींआळसशोकनाश ॥ आशापाशदूर
करीं ॥ ५८ ॥ पार्थह्मणेदेवाधिदेवा ॥ हाक्षत्रियधर्मसांगितलाब

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

रवा ॥ आमुच्याभाग्येंआलादैवा ॥ निजगुजठेवाअंतरीचा ॥ ५९ ॥
हेंज्ञानमुळींनव्हतेंठावें ॥ ह्मणोनिभ्रमलोंहोतोंमोहें ॥ आतांधरोनि
ठाकेनसोय ॥ जोशुद्धउपायस्वधर्मा ॥ ६० ॥ श्रीचेवचनेंअंतःक-
रणीं ॥ सांभाळीकृपणजैसाधनी ॥ तैसामीजीवेंभावेंकरीनिजतनीं ॥
बांधीनमनींहीग्रंथिका ॥ ६१ ॥ हेशब्दनाहींकेवळअमृत ॥ पिऊनि
आम्हींझालोंतृप्त ॥ आणिसर्वजगातृप्तीकरवीत ॥ ऐसाअपरमि
तरसकुंभहा ॥ ६२ ॥ हेंतुमच्याकृपेचेंसर्वसार ॥ आम्हांलाधलेंनि
रंतर ॥ आतांठेवूंचित्तस्थिर ॥ निर्भयअंतरसर्वदां ॥ ६३ ॥ प्रभू
तुमचेंवचनअतिनागर ॥ प्रेमळगोडअतीमधुर ॥ अज्ञानीमूढहो
तीचतुर ॥ याशब्दाअंतरनसेकीं ॥ ६४ । तुमचेउपदेशाचीचातु-
रीं ॥ जीसांगितलीवर्णविचारीं ॥ तीऐकोनसंतोषअंतरीं ॥ परमा

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

नंदपावले ॥ ६५ ॥ आतांपुढेंवैश्यशुद्रकर्म ॥ त्याचेंसांगावेंलक्ष-
ण ॥ काय क्रियाकर्मआचरणा। तेस्वधर्मसंपूर्णसांगावे ॥ ६६ ॥ हें
ऐकोनिपार्थाचेंवचन ॥ श्रीकृष्णेंआरंभिलेंज्ञान ॥ सावधहोऊनि-
कराश्रवण ॥ अतीपावनसर्वजीवां ॥ ६७ ॥

॥ कृषिगोरक्ष्यवाणिज्यंवैश्यंकर्मस्वभावजम् ॥
॥ परिचर्यात्मकंकर्मशूद्रस्यापिस्वभावजम् ॥ ४४ ॥ अ० १८ ॥

श्रीभगवानुवाच ॥ हेसव्यसाचीगुणघना ॥ श्रवणकरींवैश्यलक्ष-
णा ॥ भूमिबीजनागरयाधना ॥ हीधारणाभांडवलीं ॥ ६८ ॥
वाढीदेढीचाव्यापारकरणें ॥ सवंगीघेंघेऊनिमहर्गीदेणें ॥ व्या-
पारींद्रव्यऐसेंमिळविणें ॥ परीचित्तठेवणेंस्वधर्मीं ॥ ६९ ॥ ना-
गरेंभूमिस्वच्छकेली ॥ त्यातबीजेंजींपेरिलीं ॥ देवदशेंद्विगुणापि-

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

कलीं ॥ गुणींवाढलींअपारे ॥ ७० ॥ त्याचेनिहोईलजेंभांडवल ॥ घेणेंदेणेंआणिव्यापार ॥ नगदागिनेभूषणवस्त्र ॥ हेंसर्वत्रवैश्यगुणीं ॥ ७१ ॥ अथवागोधनेंराखणेंकांहीं ॥ गाईऋषिब्राह्मणयाज्ञिकजिहीं ॥ त्याचेसंरक्षणार्थपाहीं ॥ अवश्यराखणेंयावश्यां ॥ ७२ ॥ अथवासवंगेचीवस्तुसंग्रहींठेवणें ॥ आणिप्रसंगींमहर्गींविकणें ॥ इतकेंचीवैश्याकरणें ॥ कर्मगुणेंगुणाक्रिया ॥ ७३ ॥ ऐसेंहेंवैश्याचें गुणलक्षण ॥ घडमोडव्यापारक्रियासगुण ॥ ब्राम्हणभोजनयज्ञदान ॥ संतोषपूर्णयथाशक्ती ॥ ७४ ॥ सत्वगुणींवाटधरावी ॥ सत्यवचनींजोडीजोडावी ॥ हरीचिंतनींआवडीठेवावी ॥ कीर्तनींगावीहरीलीला ॥ ७५ ॥ स्नानसंध्याअध्यायन ॥ श्रुतिलक्षवेदपठण ॥ शांतिदयाक्षमापूर्ण ॥ याचकींमनसदांतृप्त ॥ ७६ ॥ नि-

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

स्वप्रातःकालींउठणें ॥ सडासंमार्जनगोदानें ॥ आल्याअतीताभो-
जनें ॥ अन्नदानेंवैश्यकरी ॥ ७७ ॥ वैश्यम्हणजेश्रीमंत ॥ द्रव्यें
द्रव्यवाढकरीत ॥ त्यांतपरमार्थीलक्षठेवित ॥ पुण्याअंतनसेत्या-
च्या ॥ ७८ ॥ ब्राह्मणक्षत्रियवैश्यजाती ॥ हेद्विजन्मींतिन्हीवर्ण-
पावती ॥ ऐसेंसांगितलेंअर्जुनाप्रती ॥ श्रीकृष्णदेवें ॥ ७९ ॥ ऐ
साहावैश्यगुण ॥ यापरतेंनाहींसाधन ॥ आतांऐकचतुर्थचिन्ह ॥
तेंशूद्रलक्षणयापरी ॥ ८० ॥ शूद्रातिन्हीवर्णांचेंशुश्रूषण ॥ हेंस्वक-
ष्टकर्मांचेंसांख्याज्ञान ॥ शुश्रूषणम्हणजेसेवाकरणें ॥ याधर्मेंपूर्ण-
पवित्रतो ॥ ८१ ॥ सेवाआहेबहूपरी ॥ नानाधर्मेंआणिपरिचारी-
राजग्रहींसेवाकरी ॥ रक्षणार्थउभेसदां ॥ ८२ ॥ यांतशूद्रलक्षण
कैसें ॥ ओळखावेंकळेलजैसें ॥ तेंसांगूंआतांपरिसेंसें ॥ उघडजै-

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

सैयेलक्षणीं ॥ ८३ ॥ जेथेंस्वतंत्रपणानाहींमनासीं॥ सदासर्वकाळ
जैशीदासी ॥ गुंतविलेंपरतंत्रींदेहासीं ॥ हेंएकपरिसेसींशुद्रकर्म
॥ ८४ ॥ श्रीमंतेंसेवककेला ॥ द्रव्यदेऊनीयांगोंविला ॥ आज्ञेंत-
वागणेंआहेत्याला ॥ यानांविभागिलाशूद्रकर्मे ॥ ८५ ॥ परीब्रा-
ह्मणापरोतेतया ॥ धावणेंनघडेशूद्राया ॥ तिन्हीवर्णांचीआज्ञात-
वा ॥ नमस्कारपायांधर्मनीति ॥ ८६ ॥ सेवाधर्महेंशूद्रलक्षण ॥
सदाजपणेंश्रेष्ठालागून॥जैसेमातापिताब्राम्हण ॥तैसेत्रिवर्णरक्षावे
॥ ८७ ॥ शूद्रकर्मसर्वांतश्रेष्ठ ॥ नाहींसंध्यास्नाननेमनिष्ठ ॥ आ
चारविचारनाहींकष्ट ॥ साधनवरिष्टसर्वांतें ॥ ८८ ॥ परियांतअ-
सेश्रेष्ठधर्मएक ॥ भावभक्तिलक्षणसात्विक ॥ सेवेंतसाधेपरलोक ॥
हाविवेकजरींधरी ॥ ८९ ॥ शूद्धर्मसेवाकरणें ॥ यानांतआज्ञेंत-

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

राहणें ॥ जैसेंसांगेलतैसेंवागणें॥ नेमानचुकणेंहाश्रुतिधर्म ॥ ९० ॥
कोणीद्रव्यदेऊनिसेवाकरिती ॥ कोणीपरमार्थलाभादेहविकिती ॥
सदांसर्वदांसेवेंतराहती ॥ आज्ञानुल्लंघितीस्वामीची ॥ ९१ ॥
एकाद्रव्यलोभेंप्रधानत्वआलें ॥ राजाज्ञेनेंवागूंलागले ॥ यानांव-
सेवकत्वपावलें ॥ ऐसेंझालेंहेंहीखरें॥ ९२ ॥ परंतुहेंत्रिगणात्म-
कशूद्रकर्म ॥ त्याचेंऐकासांगतोंवर्म ॥ यांतरजतमसात्विककोण ॥
हेंनिवडूनसांगतों ॥ ९३ ॥ सत्वगुणरूपसेवाधारी ॥ मातापिता-
श्रीगुरूसेवाकरी ॥ निष्कामवृत्तीअंतरीं ॥ जिव्हेधरींनामसदां ॥
९४ ॥ अखंडवेदनामवाणी ॥ सर्वदांआज्ञेंतजोडोनिपाणी ॥ दे
हींदेहाअंथरुणीं ॥ ऐशीकरणीतयांची ॥ ९५ ॥ ऐशीयागुणा-
चेंशूद्रकर्म ॥ परिसत्वगुणेंआलेंसाधकपण ॥ हेंदेवाआवडेपूर्ण ॥

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

सुलक्षणगुणसांगितला ॥ ९६ ॥ आतांशूद्रजोरजोगुणी ॥ तीराजा-
ज्ञापरममानी ॥ जगकल्याणइच्छुनी ॥ सार्थककरीदेहाचें ॥ ९७ ॥
परोपकारींदेहझिजवी ॥ नानाप्रयत्नेंसुमार्गकरवी ॥ कर्त्यापुरुषासीं-
नछकवी ॥ हेंरजोगुणीशूद्रकर्म ॥ ९८ ॥ तामसीशूद्रकर्मह्मणजेद्वार
पाळ ॥ सदांतसरराहेद्रव्यबळ ॥ सन्निधप्रशंसाकरीनिर्मळ ॥ मागें
निंदाआरंभी ॥ ९९ ॥ जैसेंभिक्षुकांअन्नवाढिलें ॥ तेजेवोनितृप्तझाले
आशिर्वादद्यावाहेंनबोले ॥ उर्मीतडोलेतमगुणीं ॥ १०० ॥ तोगुण-
ऐसापघळ ॥ निंदाकरावीबाष्कळ ॥ त्यासीकृतघ्नह्मणतीचतूर ॥ उ
गीचस्थीरराहूंनेदी ॥ १०१ ॥ हेंशूद्रतमगुणलक्षण ॥ केवळमूढअ-
तीनीचपण ॥ द्वेषमत्सरकरीदारुण ॥ ऐसागुणत्यजावा ॥ १०२ ॥
कर्मेपरतंत्रींवागणें ॥ नेमसाधनींजपणें ॥ सत्कर्मअंतरींवाढविणें ॥

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

सदांभिणेंपापासी ॥१०३॥ त्याचीसेवाहेंचिकाम ॥ आवडीनेंउच्चा
रावेंनाम ॥ कामक्रोधठेवूनसम ॥ संतोषेंधामसेवावें ॥ १०४॥ ऐ
शागुणींजोअखंड ॥ नशोधीशब्दाशब्दवितंड ॥ जेणेंघडेपापउदंड ॥
तेंप्रचंडकरीना ॥ १०५ ॥ सदांसर्वांसिनिमस्कारणें ॥ सर्वांमुखींमंग
लकार्यकरणें॥उपासनेसीदृढधरणें॥ सत्कर्मकरणेंकार्यसिद्धि॥१०६॥
एवंचारीवर्णाश्रमधर्म ॥ तुजसांगितलेपरिपूर्ण ॥ आतांपुढीलअध्या-
यींनिरोपण ॥ आहारगुणलक्षणसांगेनतुज ॥१०७ ॥ श्रीनामदेव-
वरदापांडुरंगा ॥ भीमातटवासीदिगंबरा ॥ आदिअनादिविश्वंभरा
पावनकरासकलजनां ॥ १०८ ॥ इतिश्रीस्वबोधगुणमालिका ॥ सं
मतश्रीज्ञानदेवीटीका ॥ क्षत्रियशूद्रवैश्यविवेका ॥ चतुर्थोध्यायींक-
थियेला ॥ १०९ ॥

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

श्री० ज्ञानराजमाउली.

॥ अथश्रीस्व.गुणमालिकाअ० ५ प्रा. ॥

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥ श्रीमाता-
पितृभ्योनमः ॥ श्रीकुलदेवताभ्योनमः ॥ श्रीज्ञानेश्वरनामदेवायन-
मोनमः ॥ जयजयाजीपद्मनाभा ॥ पद्मासनींपद्मरंभा ॥ सत्वगुणीं-
मुळारंभा ॥ तूंहेरंबाज्ञानमूर्ती ॥ १ ॥ सकलार्थकामेंसिद्धिदाता ॥ सि-
द्धांतरूपाअपरमिता ॥ आनंदींआनंदाबाढविता ॥ कर्ताहर्तातूंचिपैं
॥ २ ॥ तुमचेमस्तकींइंद्रनील ॥ दोहींबाजूकर्णविशाळ ॥ लंबायमा-
नशुंडासरळ ॥ दीनदयाळदीनाचा ॥ ३ ॥ तूंमायाविलासीप्रणव-
स्थाना ॥ कंठींमणिमयरत्नभूषणा ॥ चतुर्भुजाचतुराननना ॥ मनमो-
हनागणपती ॥ ४ ॥ तुमचेंदेवाअखंडध्यान ॥ सुरगणवर्णितीतुमचे
गुण ॥ गंधर्वअप्सरागातीगाणें ॥ परमप्रीतीभक्तीनें ॥ ५ ॥ प्रसन्नव-
दनागौरशामा ॥ अरंगरंगानीलधामा ॥ पतितपावनामेघश्यामा ॥

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

जगजीवात्मास्वामीतूं ॥६॥ देवाधिदेवापुरुषोत्तमा ॥ मूळबीजा-
निगमागमा ॥ वेदश्रुतिशिणलीरमा ॥ नकळेमहिमादेवातुझा॥ ७॥
सकळसंतांमाजीतूंमहंत ॥ सिध्धसाधकप्रेमळभक्त ॥ नेतिनेतिऐसें-
ह्मणत॥अगोचरचरित्रतुझेंदेवा॥८॥तुझीमायाआदिशक्ति॥तीचझा-
नाचीज्ञानज्योती॥कृपारूपीकरीशांती॥सुबुद्धिदातीदीनाची॥९॥त्या-
चकृपेचेरसाळबोल॥जेणेंहातींयेत्रिगुणमाळ॥श्रवणेंसंतोषपावतसि-
कळ॥जेसखोलसकळजीवां॥१०॥आतांचालवूंअनुसंधान॥मागील-
कथानिरोपण॥चारीवर्णउत्पत्तिस्थान॥हेंकथनचतुर्थाध्यायीं॥ ११॥
पंचमोध्यायींआहारलक्षण ॥ तेंप्रगटबोलेनारायण ॥ प्रेमळभक्त-
करोतश्रवण ॥ घाअवदानममदीना ॥ १२ ॥ इतरांनलागेगुणींगो
डी ॥ जेविषयांधबापुडीं ॥ पडलेसंसारत्रिगुणजाळीं ॥ त्यांसीही

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

कळीउमगेना ॥ १३ ॥ जेणेंघडेदेहयात्रा ॥ शुद्धपर्वकाळसुपात्रा ॥
श्रवणमात्रेंपावनगात्रां ॥ शोधीस्वसूत्रात्रिगुणीं ॥ १४ ॥ हेगुणअ-
नादिसनातन ॥ यालागींनित्याभ्यासींलावींमन ॥ तेणेंघडेलत्रिवे-
णीस्नान ॥ हेंसत्यवचनश्रीगुरूचें ॥ १५ ॥ अभ्यासींसर्वकांहींज-
डे ॥ अभ्यासींविषयाहारींपडे ॥ अभ्यासींज्ञानहोयरोकडें ॥ ना-
हींसांकडेंजीवांकांहीं ॥१६॥ असोआतांमागीलकथा ॥ परिसोनीपरि
सापुढेंआतां ॥ श्रीकृष्णधनंजयासांगता ॥ झालातातजगाचा ॥ १७

॥ आयुःसत्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धनाः ॥
॥ रस्याःस्निग्धाःस्थिराहृद्याआहाराःसात्विकप्रियाः ॥ ८ ॥ अ० १७

श्रीभगवानुवाच—हेअर्जुनाश्रवणकरीं ॥ सत्वगुणआहाराची-
परी । तुजसांगेननिर्धारीं ॥ जेणेंसंतोषसंतजना ॥ १८ ॥ आतां

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

आहारलक्षण ॥ प्रथमसांगूंसत्वगुण ॥ त्याचेंओळखावेंचिन्ह ॥ ऐ
सेंलक्षणहेंगुणीं ॥ १९ ॥ सदैवभाग्येंभोजनघडे ॥ तरींमधुरींरसीं-
आवडे ॥ कोमलसूक्ष्मजिव्हेपुढें ॥ स्वादिष्टरसींचढेरसभरी ॥ २०॥
अग्नितापेंउकडीलें ॥ तेंअन्नउत्तममधुरझालें ॥ जैसेंफळसुपक्वपिकलें ।
गोडीसआलेंमधुरपणें ॥ २१ ॥ अथवाअग्निआहारींभाजले ॥ तेप-
दार्थमृदुपणासआले ॥ तैसेंचिअग्निसंगेंस्नेहाळें ॥ रसींरसभरलेमृदु
पणें ॥ २२ ॥ आकारपाहूंजातांलहान ॥ स्पर्शितांहस्तालागेमृदु-
पण ॥ जिव्हेसींमधुरगोडगहन ॥ रसस्वादपूर्णतयासीं ॥ २३ ॥
पातळसरसरीतस्वादिष्टअन्न ॥ तेंद्रवपणापासूनीहोयसुलीन ॥ अ-
ग्नितापेंतापून ॥ आपुल्याआपणठावसोडी ॥ २४ ॥ सुंदरकोवळें
आकारसूक्ष्म ॥ परीनामेंवरिष्टउंचउत्तम ॥ जैसेश्रीगुरूमुखींचेनेम

